पंतप्रधान कृषि सिंचन योजनेतंर्गत AIBP व CAD-MW या दोन योजनेत अंतर्भूत प्रकल्पांना निधी वितरणाची कार्यवाही दि.३१.५.२०१८ पर्यंत PFMS ऐवजी सध्या प्रचलित असलेल्या पद्धतीने करण्याची परवानगी देणेबाबत .....

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: पीएलएन-२०१७ /प्र.क्र.२८५/निवसं-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ११.०५.२०१८

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक बीजीएम-१०.१७/(११२/२०१७)/अर्थ-१ दि.१४.२.२०१८
२) शासन निर्णय शुद्धीपत्रक क्रमांक पीएलएन-२०१७ /(२८५/१७)/निवसं-१ दि.२८.३.२०१८
३) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांचे पत्र क्र.गोमपाविम/लेखा-२/३६८२ दि.२५.४.२०१८
४) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांचे पत्र क्र.४२७१/ विपाविम/लेखा-३/२०१८ दि.२६.४.२०१८

प्रस्तावना :-

जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान कृषि सिंचन योजनांतर्गत AIBP व CAD-WM या दोन योजनेतील प्रकल्पांना निधी वितरीत करताना PFMS प्रणाली अंतर्गत निधी वितरणासाठी दोन स्वतंत्र खाती उघडण्यात यावीत व दि.१.४.२०१८ पासून या प्रणालीमार्फत देयके अदा करावीत अशा सुचना देण्यात आल्या आहेत. शासन निर्णय दि.२८.३.२०१८ अन्वये, AIBP व CAD-WM या योजनेतील दि.३१.३.२०१८ पर्यंतची अखर्चित रक्कम दोन स्वतंत्र खात्यात वर्ग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विभागीय स्तरावरील अधिकारी/ कर्मचारी (Cheker & maker) यांचे प्रशिक्षण प्रलंबित असल्यामुळे PFMS प्रणाली पूर्णपणे राबविणे अडचणीचे ठरत असल्यामुळे व प्रकल्पांची भौतिक प्रगती राखण्यासाठी निधी वितरण करणे आवश्यक असल्याने पंतप्रधान कृषि सिंचन योजनांतर्गत AIBP व CAD-WM या दोन योजनेत अंतर्भूत असलेल्या प्रकल्पांना निधी वितरणाची कार्यवाही PFMS ऐवजी सध्या प्रचलित असलेल्या पद्धतीने करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान कृषि सिंचन योजनांतर्गत AIBP व CAD-WM या दोन योजनेमधील असलेल्या प्रकल्पांना निधी वितरणाची कार्यवाही PFMS ऐवजी सध्या प्रचलित असलेल्या पद्धतीने करण्यास दिनांक ३१ मे, २०१८ पर्यंत परवानगी देण्यात येत आहे. दि.१ जून २०१८ नंतर प्रकल्पांना निधी वितरणाची कार्यवाही पुर्णपणे PFMS प्रणालीतूनच करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१११६४२२५७२२७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prasad Vinayakrao Kulkarni

Digitally signed by Prasad Vinayakrao Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83b8be9eb843dd6eccbd6aa4f9eecd0b5f7aca67ff32b2eef7b9ed2d85ab9442, cn=Prasad Vinayakrao Kulkarni
Date: 2018.05.11 16:43:40 +05'30'

(प्र. वि. कुलकर्णी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति: १) प्रधान सचिव, (जसं) जलसपंदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सचिव, (प्रकल्प समन्वय) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सचिव, (लाक्षेवि) जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई
४) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ
५) संचालक ,(लेखा व कोषागारे), मुंबई
६) संचालक, (सुधारणा), संचालनालय, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई
७) महालेखाकार कार्यालय, मुंबई/नागपूर
८) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अध्किारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
९) वित्त विभाग (व्यय-१२/अर्थोपाय/कोषा प्रशा-५), मंत्रालय, मुंबई
१०) मुख्य लेखाव वित्त अधिकारी, सर्व पाटबंधारे विकास महामंडळे
११) श्री. सुनिल मोने, तज्ञ वरीष्ठ वित्तीय सल्लागार, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) श्री. पद्मसिंह पाटील, सहाय्यक राज्य नोडल अधिकारी, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS), मुंबई
१३) निवसं-३ संग्रहार्थ